# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१.०५.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दि.३१.०५.२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा (दि.१ मार्च २००४ ची तहकूब सभा) महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील '' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे '' सभागृह येथे दुपारी १२.०५ वाजता '' वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली. सभेला संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसने
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०६. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०७. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
०८. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
०९. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
११. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
१२. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१३. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
१४. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
१५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
१६. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
१७. स.स.श्री.नजर हमीद अ.गफुर
१८. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
१९. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२०. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
२१. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
२२. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२३. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
२४. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
२५. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
२६. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
२७. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२८. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
२९. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
३०. स.स.सौ.संगिता बाळू मैंद

३१. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
३२. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
३३. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
३४. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
३५. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
३६. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
३७. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
३८. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
३९. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : सिडको - हडको भागातील स.सभासद सिडको कार्यालयासमोर त्यांचे विकास, मागण्यांसाठी उपोषणास बसलेले आहे. त्यामूळे आजची सभा तहकूब करावी.

श्री.भागवत कराड : सिडको -हडको भागाचे पंधरा स.सभासद सिडको - हडको भागात त्यांचे वार्डातील विकास कामे होण्या संदर्भात त्यांचे ज्या मागण्या आहेत, त्यासाठी सिडको कार्यालया समोर उपोषणास बसलेले आहे. ते या सभागृहाचे स.सभासद आहे. त्यांचे ज्या मागण्या आहेत त्या जनतेसाठी आहे. हे सभागृह सुध्दा जनतेच्या हिताचे प्रश्न सोडवतात ज्या मागण्या आहेत त्या रास्त आहे. वारंवार सिडको प्रशासनाने बजेट ठेवूनही नागरीकांसाठी पूर्ण विकास कामे सिडको-हडको भागात केलेली नाही म्हणून त्या भागाचे स.सदस्य उपोषणास बसलेले असून या सभागृहाचा पाठिंबा त्यांना आहेच व आजची सभा तहकूब करून पांठिबा म्हणून सर्व सदस्य, पदाधिकारी यांनी उपोषणात सामील व्हावे, अशी विनंती आहे.

श्री.संजय शिरसाट, श्री.जयवंत ओक : कोरमही पूर्ण नाही सभा तहकूब करावी. सिडको-हडको भागातील सर्व स.सभासद उपोषणास बसलेले आहे, त्यांचे मागण्या काय आहेत त्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करावे. सभागृहनेते,विरोधी पक्षनेते, मा.महापौर यांनी प्रत्यक्ष जावून भेट घ्यावी. प्रश्न मार्गी कसे लागतील त्यासाठी प्रयत्न करावे. आजची सभा तहकूब करावी. गणपूर्ती अभावी सभा तहकूब करावी.

श्री.जयवंत ओक : सभागृहात कोरम नाही. काही सदस्य सिडको ऑफिस समोर उपोषणाला बसलेले आहे. सभा तहकूब करावी.

श्री.भागवत कराड : या सभागृहाचा त्या सदस्यांना पाठींबा आहे. असे म्हणून सभा तहकूब करावी.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : या सभागृहाचे सर्व सदस्यांनी त्यांचे बरोबर सामील व्हावे, आजची सभा तहकूब करावी.

मा.महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून आजची सभा तहकूब करण्यांत येते.

नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.